International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# भारतातील आदिवासी समुदाय : भूतकाळ, वर्तमान व भविष्य

**उर्मिला विठ्ठल बांगर**
*संशोधक विद्यार्थी*

*Corresponding Author – उर्मिला विठ्ठल बांगर*
**DOI - 10.5281/zenodo.17656444**

**प्रस्तावना:**

आपला भारत देश हा विविधतेतून एकता जपणारा वैभवशाली देश आहे. यामुळे जागतिक स्तरावर भारत देशाची एक स्वतंत्र ओळख आहे. भारतात विविध धर्म, पंथ, वंश आणि संस्कृतीचे लोक राहतात. आज शेकडो वर्षानंतरही सर्व धर्म, पंथ, जाती समुदाय एकत्रित भारतात नांदताना दिसतात. एवढेच नाही तर विविध भाषा आणि बोलीभाषा बोलणारे लोक इथे आहेत. त्यामुळे भारतीय समाजात विविधता आढळते. विविधता हे भारतीय संस्कृतीचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये आहे. भारतीय समाजात विविधता दिसत असली तरी भारतात वास्तव्य करणारी प्रत्येक व्यक्ती ही भारतीयच आहे. आपला भारतीय समाज अनेक प्रकारच्या जातीमध्ये विभाजित झालेला असून भारत देशात सहा हजारापेक्षा जास्त जाती आणि उपजाती आहेत. भारतातील प्रमुख आदिवासी समुदायात गोंड, भिल्ल, मीना, मुंडा, संथाल आणि कोरकू इत्यादी समुदायाचा समावेश आढळतो. हे आदिवासी समुदाय देशाच्या वेगवेगळ्या राज्यात आढळतात. 'गोंड' हा आदिवासी समुदाय भारतातील सर्वात मोठा आदिवासी समुदाय आहे. तो प्रामुख्याने मध्य प्रदेश, छत्तीसगड व महाराष्ट्रात आढळतो. हे आदिवासी समुदाय आपल्या परंपरा आणि संस्कृतीमुळे सर्वपरिचित आहेत. 'भिल्ल' हा आदिवासी समुदाय भारतात राजस्थान गुजरात व मध्य प्रदेशात आढळतो. 'मीना' हा आदिवासी समुदाय राजस्थानमध्ये आढळतो. 'संथाल' हा आदिवासी समुदाय पूर्व भारत झारखंड पश्चिम बंगाल व उडीसा या राज्यात वास्तव्याला आढळतो. 'कोरकू' हा आदिवासी समुदाय मध्य प्रदेश व महाराष्ट्राच्या काही भागात आढळतो. 'भुतिया' हा आदिवासी समुदाय सिक्कीम, उत्तराखंड व हिमाचल प्रदेशात आढळतो. तसेच 'चेंचू' हा आदिवासी समुदाय आंध्रप्रदेश व तेलंगणा मध्ये आढळतो. 'बकरवाल' हा आदिवासी समुदाय भारतातील जम्मू आणि काश्मीर या राज्यात आढळतो. त्याचबरोबर भारतात भिल्ल, वारली, कोळी, कातकरी, ओराव, कोकणा, कोलाम, ढोर कोळी, टोकरेकोळी, ठाकर, परधान, पावरा, मल्हार ,मुन्नेर, वारू, महादेव कोळी, माडिया गोंड व हलबा इत्यादी प्रमुख आदिवासी जमाती आढळतात. या आदिवासी जमाती उडीसा, मध्यप्रदेश, छत्तीसगड, झारखंड, राजस्थान आणि ईशान्य कडील काही राज्य इत्यादी प्रदेशांमध्ये मोठ्या प्रमाणावर आढळतात. आदिवासी समाजात परंपरेला सर्वाधिक महत्त्व दिसते. तसेच त्यांच्यामध्ये एकजिनसीपणा व सामाजिक नियंत्रण जास्त आढळते.

निसर्गाच्या सान्निध्यात राहत निसर्गाला देव मानणारा आदिवासी समाज आहे. त्या कारणाने या आदिवासी समाजाची अर्थव्यवस्था प्रामुख्याने निसर्गातून मिळणाऱ्या संसाधनावर व सहकार्यावर आधारित आढळते. महाराष्ट्र राज्यामध्ये वारली, गोंड, पारधी, कोरकू, पावरा आणि आदिवासी इत्यादी आदिवासी जमाती आढळून येतात. आदिवासी हा शब्द 'आदि' आणि 'वासी' या दोन शब्दापासून बनला आहे . द्रोपदी मुर्मू या स्वतंत्र भारताच्या पहिल्या आदिवासी महिला राष्ट्रपती झाल्या. प्राचीन ग्रंथामध्ये आदिवासींना 'अत्विक' (संस्कृत ग्रंथामध्ये) म्हटले आहे. तर पुढील काळात महात्मा गांधींनी आदिवासींना 'गिरीजन' म्हणून संबोधले. कारण बहुतेक आदिवासी लोक हे जंगलात आणि डोंगरात राहणारे आहेत. ऐतिहासिक स्त्रोतानुसार आदिवासी हेच भारताचे मूळ रहिवासी आहेत, असा गांधीजींचा विश्वास होता. समुदाय म्हणजे लोकांचा समूह. अतिपूर्वीपासून समूहाने राहत आलेला आदिवासी समुदाय रानावनात राहत आलेला आहे तसेच हा आदिवासी समुदाय उदरनिर्वाहासाठी अरण्यमय जीवन जगत आलेला दिसतो.

'भारताचे शूर धनुष्य पुरुष' म्हणून गौरवाने आदिवासी समूहांचा उल्लेख केला जातो. संस्कृती आणि परंपराचे जतन पाहताना मराठीत जसा संत साहित्यातून लोकसंस्कृतीचा जागर झाला, तसेच आदिवासी समुदायात त्यांच्या परंपरा, सण, कथा, संस्कृती जपत आदिवासी समुदायाचे वेगळेपण व वैशिष्ट्य हा समुदाय जपत आलेला आहे. परंतु काळाच्या ओघात आज या आदिवासी समुदायासमोर अनेक अडचणी, सामाजिक संघर्ष, आत्माभिव्यक्ती आणि संस्कृतीचे जतन यासारख्या अनेक समस्या या आदिवासी समुदायाला भेडसावताना दिसतात. भारतात संस्कृती टिकवत व वृद्धिंगत करणारा एक महत्त्वपूर्ण परंतु, दुर्लक्षित समूह म्हणून आदिवासी समुदाय दिसतो.आदिवासी समूहाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे हा समूह आजही निसर्गाच्या कुशीत वास्तव्याला आहे आणि निसर्गालाच हा आदिवासी समुदाय आपला देव मानतो. भारतातील आदिवासी समुदाय हा देशाच्या विस्तृत पटातील एक महत्त्वाची आणि स्वतंत्र वाट आहे जी आदिवासींच्या आवाजाला स्थान देत सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने यशाची वाटचाल करत आहे. सद्यपरिस्थितीत भारतातील आदिवासी समूहाच्या सर्वांगीण परिस्थितीवर संशोधन होणे काळाची गरज आहे. कारण या आदिवासी समुदायाच्या सामाजिक परिस्थिती, आर्थिक परिस्थिती आणि शैक्षणिक दर्जा या गोष्टीवर प्रकाश पडणे गरजेचे आहे.

**भारतातील आदिवासी समुदायाचा भूतकाळ:**

जल, जंगल आणि जमिनीचे रक्षण करत आदीम काळापासून चालत आलेला आदिवासी समुदाय आहे. आदिवासी समुदाय हा भारतातील सर्वात व्यापक समुदाय आहे. प्राचीन काळी हे आदिवासी लोक इजिप्त पासून ते श्रीलंकेपर्यंत पसरलेले होते. या आदिवासी वंशाची राजवट डोंगराळ भागात होती. आदिवासी राजांची सत्ता प्रामुख्याने भारतात महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, ओडीसा, छत्तीसगड तसेच सह्याद्री पर्वत, सातपुडा पर्वत व विंध्य पर्वतात आढळून येते, अतिपूर्वीपासून आदिवासी समुदाय हा रानावनात राहत आपल्या उदरनिर्वाहासाठी अरण्यमय जंगली जीवन जगत आलेला आहे. या आदिवासी समुदायाच्या भूतकाळाचा शोध घेतला तर असे निदर्शनास येते की एकलव्य यांना महाभारत कालीन राजाचे वंशज म्हणून बघितले जाते. या गोष्टीचा स्पष्ट उल्लेख हिंदूंचे सर्वात मोठे गद्यखंड असणाऱ्या

महाभारत या ग्रंथात याचा उल्लेख आढळून येतो. त्याचबरोबर मध्ययुगांमध्ये ही या आदिवासी समुदायाचा संदर्भ आलेला आहे. छत्रपती शिवरायांच्या राजवटीतही मुख्य सहकार्यामध्ये बऱ्याच मोठ्या प्रमाणावर आदिवासी समाजाच्या व्यक्ती होत्या कारण त्यांचे बळकट शरीर व शूरपणा . त्यांच्या या सामर्थ्यामुळे त्यांची साथ शिवरायांना मोलाची होती. त्याचप्रमाणे भारतीय स्वातंत्र्यलढ्यात जननायक बिरसा मुंडा या आदिवासी तरुणाचे योगदान तर न विसरण्याजोगे आहे. अशा या आदिवासी समुदायाकडे मध्ययुगात किल्ले, राजवाडे, गड, शेत राखण, गावचे राखण, करण्याचे काम तत्कालीन व्यवस्थेमार्फत सोपवण्यात आले. परंतु बदलत्या परिस्थितीमुळे त्यांचीही ठरलेली कामे संपुष्टात आली आणि आदिवासी जमातीवर वाईट दिवस आले. बदलत्या परिस्थितीमुळे त्यांच्या हाताला काम उरले नाही. शेतात अन्न-धान्य पिकवण्यासाठी मिळालेली जमीन सुद्धा उरली नाही. मग अशावेळी त्यांनी नाईलाजानी मोठे-मोठे जमीनदार, श्रीमंत आणि सावकार यांना उदरनिर्वाहाच्या कारणामुळे लुटण्याचे काम केले. त्यावेळी इंग्रज राजवटीत ब्रिटिश सरकारने त्यांच्यावर कडक निर्बंध लादले. तसेच गावात किंवा एखाद्या ठिकाणी चोरी झाली, तर सरळ आदिवासी समाजातील गरीब व्यक्तींना पकडून नेले जाई आणि त्यांच्यावर जोर जबरदस्तीने हाणमार करत गुन्हे लादत असत. अशा काळात म्हणजे ब्रिटिशांच्या राजवटीत आदिवासींना चोर, लुटारू या शब्दांनी संबोधले जाऊ लागले. परंतु कालांतराने १९५६ च्या कायद्यानुसार आदिवासी समाजावरील या अनिष्ट जुलमाचे जोखड उतरवण्यात आले आणि भारतातील आदिवासी समुदायासाठी ‘भटक्या जमाती’ ही संकल्पना नावारूपास आली.

आदिवासी जमात ही महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक लोकसंख्या असलेली जमात आहे. आदिवासी समुदाय डोंगरदऱ्याप्रमाणे मैदानी प्रदेशातही वाडया- वस्त्या करून वास्तव्यास आहे. आपण ग्रामीण भागाचा विचार केला तर गावाच्या एका भागात किंवा कोपऱ्यात हा आदिवासी समुदाय वस्ती करून राहतो. त्याला ‘भिलाटी’ किंवा ‘भिल्लहाटी’ असे देखील म्हणतात. त्याचप्रमाणे धुळे जिल्ह्यातही आदिवासी जमात मोठ्या संख्येने सर्वाधिक वस्ती करून वास्तव्यास आढळते. या आदिवासी लोकांच्या वस्त्या गावांना लागूनच असतात. या आदिवासी समुदायाच्या नावाची विशिष्ट नावाने ओळख आहे. जसे ‘वाळवी’ म्हणजे जंगलात राहणारे आदिवासी, ‘वसावे’ म्हणजे डोंगर कपाटीत राहणारे आदिवासी, ‘तडवी’ म्हणजे नदीच्या तीरावर काठावर राहणारे आदिवासी, ‘नाईक’ म्हणजे समाज प्रमुख तर ‘गोवा’ म्हणजे पशुपालक होत. या ‘गोवा’ समुदायाच्या लोकांकडे स्वतःची जमीन नसते. ते गावाबाहेर राहत असतात. अशा प्रकारे पावरा, धनका आणि गावित या आदिवासी भिल्लांच्या उपशाखाच मानतात. महाराष्ट्रामध्ये इतर जाती-जमाती प्रमाणे आदिवासी या जमातीच्या नावाची नोंद ‘अनुसूचित जमातीच्या’ यादीत आढळते. तसेच केंद्र सरकारच्या यादीत राज्यस्थान, मध्यप्रदेश, गुजरात, महाराष्ट्र या राज्याच्या यादीत आदिवासी जमातीचा समावेश आढळतो. भारतातील आदिवासी लोकांमध्ये ठाकरे, मालवे, मोरे, पवार, सोनवणे, मालचे इत्यादी आडनावे येतात. ही आदिवासी जमात इतर जाती-जमाती पेक्षा अधिक मागासलेली असून त्यांच्या चालीरीती भिन्नस्वरूपाच्या आहेत. महाराष्ट्रात हा आदिवासी समुदाय छत्रपती संभाजीनगर, धुळे, जळगाव, नाशिक या जिल्ह्यात आढळतो. तसेच धुळे जिल्ह्यात सिंदखेडा, शिरपूर, साखरी व सातपुडा पर्वता

जवळील काही भाग हा आदिवासी समुदायाने व्यापलेला आहे.

अशाप्रकारे पुरातन काळातील पुराणांमध्ये अव्ययकामध्ये आदिवासी समाजाचा स्पष्ट उल्लेख अनेक ठिकाणी आढळतो. रामायणामध्ये प्रभू श्रीरामचंद्र वडकरण्यात आले, तेव्हा शबरी नावाच्या वृद्ध आदिवासी स्त्रीने रामाला बोरे खायला देऊन त्यांचे स्वागत केल्याची सुप्रसिद्ध कथा आहे. त्यावरून आर्य रघुवंशाचे राजपुत्र रामचंद्र दक्षिण भारतात पोहोचण्यापूर्वीच इथे आदिवासींचे वास्तव्य होते हे यावरून सिद्ध होते .

**आदिवासींच्या वास्तव्याची प्रमुख ठिकाणे:**

1) **सह्याद्री विभाग:**

सह्याद्री पर्वतरांगाच्या विभागात वारली, महादेव कोळी तर कोकणात कातकरी व ठाकर या जमातीची वस्ती आढळते.

2) **सातपुडा विभाग:**

सातपुडा पर्वतरांगांमध्ये तापी व नर्मदा नदीमधील पहाडी प्रदेश तसेच आजूबाजूचा सखल व पर्वतमय प्रदेश 'भिलवाड' या नावाने ओळखला जात होता. त्याचबरोबर सातपुड्यापासून विंध्य, अरवली पर्वतरांगापर्यंत भिलवाड पसरलेला होता. या सातपुडा पर्वतरांगांमध्ये कोकण, गावित, भिल्ल, दुबळा, दणका या जमातीची वस्ती पहावयास मिळते.

3) **गोंडवन विभाग:**

विदर्भातील डोंगराळ व जंगलमय प्रदेशात चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ, अमरावतीचा मेळघाट या विस्तृत प्रदेशात माडिया, गोंड, बडामाडिया, परधान, कारकू, कोलम, हळवा, अंध या जमातीचे वास्तव्य आहे. जिल्ह्यास्तरीय विचार करता ठाणे, रायगड, पुणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, यवतमाळ, चंद्रपूर, अमरावती, गडचिरोली या महाराष्ट्रातील जिल्ह्यात आदिवासींची जमात आढळते. तसेच महाराष्ट्रात आदिवासीच्या एकूण ४७ जमाती आहेत. त्यापैकी २०११ च्या जनगणनेनुसार गोंड, भिल्ल, महादेव कोळी, वारली, कोकण आणि ठाकूर यांची एकत्रित संख्या महाराष्ट्रातील एकूण आदिवासींच्या ७३.३ टक्के एवढी आहे. तसेच भारतामध्ये आदिवासी लोकांची लोकसंख्या सुमारे १८.४ कोटी आहे. (गुगल वरून साभार) भारतीय राज्यघटनेत आदिवासीसाठी 'अनुसूचित जमाती' हा शब्द वापरण्यात आला आहे.

भारतातील प्रमुख आदिवासी समुदाय म्हणजे अंध, गोंड, खरवार, मुंडा, खाडिया, बोडो, कोल, भिल्ल, कोळी, सहारिया, संथाल, भूमीज, ओराव लोहरा, बिरहोर पारधी, असुर, बिलाला, मिना इत्यादी आहेत. भारत सरकारने भारतीय राज्यघटनेच्या पाचव्या अनुसूची मध्ये 'अनुसूचित जमाती' म्हणून आदिवासी समुदायाला मान्यता दिली आहे. अनेकदा त्यांना अनुसूचित जातीसह 'अनुसूचित जाती आणि जमाती' या एकाच श्रेणीत ठेवले जाते.

**भारतातील आदिवासी समूहाची संस्कृती व भाषा:**

अति प्राचीन वैभवाने नटलेली आदिवासी संस्कृती ही भाषा, कला, नृत्य, संगीत, परंपरा आणि विविधतेने समृद्ध आहे.

**१) आदिवासी संस्कृती:**

**कला आणि संगीत:** आदिवासी समुदायाकडे अद्वितीय कला, संगीत आणि सणांचा समृद्ध सांस्कृतिक वारसा आहे .

**सामाजिक संरचना:** आदिवासी समुदायाची सामाजिक संरचना ही कुटुंबातील नातेसंबंधावर त्याचबरोबर वडीलधाऱ्यांसाठी असलेल्या विशिष्ट भूमिकेवर जोर देत असल्याचे आढळते.

**परंपरा आणि विधी:** भारतीय आदिवासी समुदायांमध्ये निसर्गपूजा, पूर्वजांची पूजा आणि विविध सण हे त्यांच्या परंपरा व विविधतेचे भाग आहेत.

**२) आदिवासी भाषा वैविध्य:**

भारतातील आदिवासी समुदायासाठी विविध भाषा आहेत ज्या त्यांच्या विशिष्ट गटाच्या विशिष्ट पारंपारिक भाषा आहेत.

**भाषा कुटुंबे:** आदिवासी भाषा मध्ये ओस्ट्रो एशियाटिक इंडो आर्यन आणि तिबेटो बरणी यासारख्या विविध भाषा कुटुंबाचा समावेश होतो.

**सांस्कृतिक महत्त्व:** आदिवासी भाषांमध्ये त्यांची संस्कृती, इतिहास, गीत, कथा आणि जीवनमूल्ये सामावलेली असतात. ज्यामुळे त्या मौखिक साहित्यातून पिढ्यानपिढ्या जपल्या जातात.

**आदिवासी साहित्य चळवळीतील आदिवासी साहित्यकांचे योगदान:**

**१) महाश्वेता देवी:** महाश्वेता देवी या आदिवासींच्या जीवनावर आधारित लेखन करणाऱ्यापैकी प्रमुख आदिवासी साहित्यिक होत. त्यांनी 'हजार चौरशीची आई', 'अर्जरि अडवा' आणि 'जंगल के दावेदार' या कादंबऱ्यातून आदिवासींच्या शोषणाचे विदारक चित्रण चित्रित केलेले दिसते .

**२) नंदा खरे:** नंदा खरे यांनी आदिवासी समाजाच्या समस्या व त्यांचे अस्तित्व याबद्दल विचार मंथन करणारे साहित्य निर्माण केलेले आढळते.

**३) रमनिता गुप्ता:** रमनिता गुप्ता यांनी आदिवासी साहित्याला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. तसेच त्यांनी संपादित केलेल्या विविध पुस्तकांमधून अनेक आदिवासी लेखकांना व्यासपीठ मिळाले आहे.

**४ ) लक्ष्मण गायकवाड:** मराठी साहित्य विश्वात 'उचल्या' या आत्मकथनातून आदिवासी आणि भटक्या जमातीच्या संघर्षमय जीवनाचे दर्शन लक्ष्मण गायकवाड यांनी घडवले आहे.

आदिवासी समाजाची वेगळी ओळख आणि अस्मिता हा आदिवासी साहित्याचा गाभा आहे. आपल्या साहित्यकृतीद्वारे आदिवासींनी आपल्या अधिकारासाठी व अस्तित्वासाठी लढा दिला पाहिजे, हे त्यांच्या साहित्यातून व्यक्त होताना दिसते. आदिवासी साहित्य हे केवळ भावना व्यक्त करणारे नाही, तर ते सामाजिक व राजकीय जागरूकता निर्माण करणारे आहे. त्याचबरोबर आदिवासी हक्क, पर्यावरण संरक्षण व सामाजिक सुधारणेसाठी हे आदिवासी साहित्य प्रेरणा देते.

**आदिवासी साहित्य चळवळ आणि प्रबोधन:**

आदिवासी साहित्य चळवळ ही केवळ साहित्यिक अभिव्यक्ती पुरती मर्यादित नाही, तर ती सामाजिक बदल घडून आणणारी चळवळ आहे. या चळवळीने आदिवासी समाजात प्रबोधन घडवून आणलेले आहे.

**१) पर्यावरण संरक्षण आणि नैसर्गिक हक्क:** आदिवासी साहित्य हे पर्यावरण संवर्धनाबाबत महत्त्वाचा संदेश देते. जंगलतोड, विस्थापण प्रदूषण यासारख्या मुद्द्यावर प्रकाश टाकते.

**२) शिक्षण आणि साक्षरता चळवळ:** चळवळ म्हणजे दोन-चार दिवसाची जत्रा नव्हे... तर सतत विकसित होत जाणारा माणुसकीचा गाभा ( 6) असे आदिवासी साहित्य संस्कृतीच्या संदर्भात सोनवणे भारू म्हणतात ते यथार्थ वाटते.

**३) स्त्री जागरूकता आणि सशक्तिकरण:** आदिवासी साहित्याने आदिवासी स्त्रियांच्या हक्काविषयी जागरूकता निर्माण केली आहे.

**आदिवासी साहित्य चळवळी समोरील वर्तमान व भविष्यातील आवाहने:**

**१) भाषेची अडचण:** अनेक आदिवासी भाषांमध्ये लिहिलेले साहित्य मोठ्या प्रमाणात प्रचलित भाषांमध्ये भाषांतरित केले जात नाही, याबद्दल 'आदिवासींचे अनोखे विश्व' मध्ये लेखक निरंजन पाटील म्हणतात, 'मानवी संस्कृतीचा उगम सुमारे १०,००० ते ७०० वर्षांपूर्वी झाला असे उत्खननातील पुरावे सांगतात; तेव्हापासून माणूस कसा बदलत आला याचा अभ्यास फक्त आदिवासी बोली भाषेतूनच होऊ शकतो'.

**२) मुख्य प्रवाहातील साहित्यकृती पेक्षा दुर्लक्ष:** आदिवासी साहित्याला अजूनही मुख्य प्रवाहात पुरेसा सन्मान आणि महत्त्व मिळत नसलेले दिसते.

**३) प्रकाशन आणि वितरण समस्या:** आदिवासी साहित्य प्रकाशित करणे आणि ते मोठ्या प्रमाणावर वाचकापर्यंत पोहोचवणे ही आजसुद्धा एक मोठी अडचण असल्याचे आढळते.

**भारतातील आदिवासी समूहातील स्त्री जीवन:**

भारतीय आदिवासी समूहतील स्त्री जीवन संघर्षाने भरलेले दिसते. या आदिवासी स्त्रियांना सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक आव्हानांना सामोरे जावे लागते. त्यांना नेहमी अडचणीचा सामना करावा लागतो. परंतु, तरीसुद्धा आदिवासी समाजातील स्त्रिया आर्थिकदृष्ट्या सक्रिय दिसतात. त्याचबरोबर घराच्या प्रगतीमध्ये ही महत्त्वपूर्ण योगदान त्या देतात. भारतीय परंपरेत पुरुषसत्ताक संस्कृतीमध्ये स्त्रियांची स्थिती कमकुवत आहे. तरीसुद्धा या आदिवासी स्त्रिया समर्थपणे सर्व जबाबदाऱ्या पार पाडताना दिसतात. बरेचदा या स्त्रियांना भेदभावाचा सामना देखील करावा लागतो. खास करून शिक्षण, आरोग्य आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बलता इत्यादी गोष्टीत हा भेदभावाचा सामना करावा लागताना दिसतो. तरीसुद्धा आदिवासी स्त्री शिक्षण आणि स्वयंसहाय्यता समूह (SHG) द्वारा सशक्तिकरणाच्या दिशेने वाटचाल करताना दिसते. त्याचबरोबर आपल्या हक्कासाठी संघर्ष करतानाही आदिवासी स्त्री अग्रस्थानी राहण्याची भूमिका बजावताना दिसते.

**१) आर्थिक योगदान आणि संघर्ष:**

आर्थिक भागीदारी - आदिवासी स्त्रिया पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करताना दिसतात ज्यामुळे काही प्रमाणात त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होताना दिसते.

स्वय सहायता समूह ( SGH)- स्वय सहायता समूहाच्या साह्याने आजची आदिवासी स्त्री आर्थिक व सामाजिक दृष्टीने जागृत होत आत्मविश्वासाने जीवन जगताना दिसते.

सामाजिक व सांस्कृतिक आव्हाने – अंधश्रद्धा, प्रथा, परंपरेच्या कारणास्तव आजही आदिवासी स्त्रियांचे जीवन कठीण व बंदिस्त झालेले आढळते.

संस्कृतीच्या ओळखीची ओळख - आदिवासी स्त्रिया आपली संस्कृती व ओळख टिकवण्यासाठी संघर्ष करताना आढळतात. खासकरून हा संघर्ष बाहेरील समाजाच्या वाढत्या दबावापोटी दिसतो. तसेच आदिवासी स्त्रियांमध्ये शिक्षणाचा अभाव आणि आरोग्याविषयी समस्या आढळतात. जागरूकता व आंदोलनाच्या माध्यमातून आज आदिवासी स्त्रियांचा आवाज बुलंद होताना दिसत आहे. जल, जंगल व जमिनीच्या रक्षणासाठी आदिवासी स्त्रिया आंदोलनाचे नेतृत्व करत आंदोलनात सक्रिय भूमिका मांडताना

आढळतात. अशा प्रकारे आदिवासी स्त्री जटील व बहुआयामी जीवन जगताना दिसते. जिथे ती आपला समुदाय आणि संस्कृतीला वाचवत-वाचवत आपली ओळख आणि हक्कासाठी जीवन जगताना दिसते.

**भारतातील आदिवासी समुदाय: वर्तमान व भविष्य:**

आदिवासी समाज हा भारतीय समाजातील दुर्बल घटकांपैकी एक आहे. या आदिवासी समाजाला मूळचे रहिवासी, भूमिपुत्र, जंगलाचे राजे अशा अनेक नावांनी ओळखले जाते. आदिवासी समाज प्रगत समाजापासून अलिप्त दूर रानावनात व डोंगरदऱ्यात वास्तव्य करणारा आहे. बोलीभाषा आणि धर्म याबाबतीत समानता असलेला साधा, सामाजिक आदिवासी समुदाय आहे. तसेच दुर्गम भूभागात वास्तव्य, समान रक्तसंबंधावर आधारित समूह, लहान आकार, स्वतःची बोलीभाषा, समान धर्म व प्राथमिक संबंधाचे प्राबल्य अशी काही खास वैशिष्ट्ये या आदिवासी समूहाची सांगता येतील.

**आदिवासी समुदायाच्या वर्तमान व भविष्यातील समस्या:**

भारतातील बहुतेक सर्व आदिवासी जमाती, समुदाय हे आर्थिक, सामाजिक, राजकीय व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या अवस्थेत जीवन जगत आलेले आहेत. वर्तमान व भविष्यात आदिवासी समुदायाचा प्रगत समाजाशी संबंध येऊ लागला आहे. परंतु प्रगत समाजाशी वाढत्या संबंधाचा, संपर्काचा आदिवासींना लाभ मिळण्याऐवजी नुकसान जास्त झाल्याचे दिसते. त्या अनुषंगाने आदिवासी समुदायाला भविष्यात भेडसावणाऱ्या काही महत्त्वाच्या समस्या पुढील प्रमाणे सांगता येतील.

**१) आदिवासींच्या वर्तमान व भविष्यातील सामाजिक आणि सांस्कृतिक समस्या:**

**अनिष्ट प्रथांचा शिरकाव:**

आदिवासींची जीवनपद्धती अतिशय साधी होती. परंतु प्रगत समाजाशी संबंध आल्याने प्रगत समाजातील अनेक अनिष्ट प्रथांचा शिरकाव त्यांच्या जीवनात आला आहे. उदा. (हुंडा पद्धती, बालविवाह). या समाजात बालविवाहाची प्रथा नव्हती पूर्वी त्यांच्यात वस्तूच्या स्वरूपात वधूमूल्य घेण्याची प्रथा होती, परंतु प्रगत समाजाच्या संपर्काने त्यांचा परिणाम हुंडा घेण्यामध्ये झाला आहे त्यामुळे स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत गेला आणि त्यातूनच त्यांच्या प्रामाणिक जीवनपद्धतीला तडा गेल्याचे आढळते.

**स्त्रियांचे शोषण:**

प्रगत समाजातील व्यापारी, जमीनदार व सावकार अशा अनेक घटकांनी आदिवासी स्त्रियांचे शोषण केल्याचे आढळते. अशा घटकांच्या दृष्टीने आदिवासी स्त्रिया उपभोगाच्या वस्तू ठरल्याच्या दिसतात. आदिवासी समुदायाचे भोळेपण, दारिद्र्य या गोष्टी म्हणजे या घटकांना संधी वाटली आणि या संधीचा फायदा घेत या घटकांनी बरेचदा आदिवासी स्त्रियांना वासनेचे शिकार बनवलेले दिसते.

**२) आरोग्य व शिक्षणासंबंधीच्या वर्तमान आणि भविष्यातील समस्या:**

**कुपोषण:**

आदिवासी समुदाय हा जंगल व रानावनात राहणारा असल्यामुळे शरीराच्या पूर्ण वाढीसाठी आवश्यक असलेली जीवनसत्वे, उष्मांक व इतर पोषण घटक त्यांना त्यांच्या रोजच्या आहारातून जंगलात व दुर्गम भागात मिळत नाहीत. परिणामी त्यातून कुपोषणासारख्या आजाराची समस्या निर्माण होताना दिसते.

**व्यसनाधीनता:**

आर्थिक दृष्ट्या सुबत्ता नसलेला हा आदिवासी समाज गरीबी आणि बिकट परिस्थितीमुळे व्यसनाधीनतेच्या आहारी गेलेला आढळतो. कित्येकदा त्यांच्यावर अर्धपोटी राहण्याचे प्रसंग येतात. तेव्हा दुःखाचा विसर पडावा म्हणून हा समाज व्यसनाकडे वळतो व त्यातून अधिकच दरिद्री होताना आढळतो.

**आरोग्यविषयक सुविधांचा अभाव:**

आदिवासी समाज रानावणात राहत असल्याने चांगल्या प्रकारच्या आरोग्यसुविधा त्यांना मिळताना दिसत नाहीत. तसेच आदिवासींच्या भागात जाऊन त्यांना सेवा देण्यासाठी उच्चशिक्षित डॉक्टरसुद्धा तयार नसताना दिसतात, त्यामुळे औषधांचा तुटवडा जाणवतो. त्यामुळे अनेक आदिवासी रोगग्रस्त होतात, बरेचसे वैयक्तिक स्वच्छतेकडे सुद्धा लक्ष देत नाहीत. यामुळे त्यांच्या समुदायांमध्ये बरेचदा त्वचेचे व साथीचे रोग मोठ्या प्रमाणात दिसून येतात ही बाब वर्तमान व भविष्याच्या दृष्टीने धोक्याची घंटा जाणवते.

**राखीव जागा:**

आदिवासींना संसदेत व घटक राज्य विधिमंडळात राखीव जागा ठेवण्यात आल्या आहेत. आदिवासी व्यक्तीसाठी शासकीय नोकऱ्यांमध्ये आणि शैक्षणिक प्रवेशांमध्ये राखीव जागा ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे. आदिवासी साठी आश्रम शाळा: केंद्र सरकारने सन १९९०-९१ मध्ये ही योजना सुरू करत या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांचे राहणे, जेवणे व शिक्षण अशा सर्व सोयी योजनेच्या माध्यमातून सरकारच्या खर्चातून होतात .

**आदिवासी युवकांसाठी व्यावसायिक शिक्षण:**

ही योजना सरकारने १९९२-९३ पासून सुरू केली. आदिवासी युवकांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, त्यांच्यात कौशल्याचा विकास व्हावा हा मूळ उद्देश या योजनेचा आहे.

**राजीव गांधी राष्ट्रीय फेलोशिप:**

सन २००५-०६ पासून राजीव गांधी फेलोशिप योजना जनजाती कार्य मंत्रालयाने सुरू केली आहे. पी .एचडी, एम. फील अशा प्रकारचे उच्च शिक्षण घेण्यासाठी या योजनेअंतर्गत होतकरू आदिवासी विद्यार्थ्यांना अर्थसहाय देण्यात येते.

**आदिवासी महिला सशक्तिकरण:**

केंद्र सरकारने सन २००२-०३ मध्ये ही योजना सुरू करत दारिद्रय रेषेखालील आदिवासी महिलांना किरकोळ कामासाठी ५० हजार रुपयांपर्यंत ४(चार) टक्के व्याजाने कर्ज उपलब्ध करून दिले जाते. आदिवासींची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी या गोष्टीचा फायदा होतो.

**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प:**

आदिवासी समाजाचे जे लोक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या बाहेर आहेत त्यांना आदिवासी क्षेत्र उपाययोजनेचे फायदे उपलब्ध करून देण्यासाठी माडा (Modifild area Development Approach (MADA) आणि मिनी माडा (MANI MADA) इत्यादी क्षेत्र तयार करण्यात आली आहेत .

**स्वयंसेवी संघटनांचे योगदान:**

बाबा आमटे स्थापित 'महारोगी सेवा समिती' च्या वतीने 'लोकबिरादरी हेमलकसा' येथे आदिवासी विकास प्रकल्प राबविला जात असून त्यामार्फत आदिवासी कल्याणाच्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. तसेच अनुताई वाघ यांनी कोसबाड येथे 'ग्रामबाल शिक्षण केंद्राची' स्थापना करून आदिवासींमध्ये शिक्षणाचा प्रसार केला आहे. त्याचबरोबर मेधा पाटकर यांनी नर्मदा बचाव आंदोलन सुरू करून विस्थापितांना न्याय मिळवून देण्यासाठी

प्रयत्न चालवले आहेत. श्रमजीवी संघटना, आदिवासी सेवा संघ अशा अनेक स्वयंसेवी संघटनांनी आदिवासी विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिल्याचे आढळते.

**समारोप:**

वनपुजक असणारा आदिवासी समाज हा आदिम समाज म्हणून ओळखला जातो. हा आदिवासी समाज स्वतःची अशी एक खास न्याय व्यवस्था निर्माण करताना दिसतो. आधुनिकीकरणाचे परिणाम सर्व क्षेत्रात दिसतात, त्याचप्रमाणे आज घडीला आदिवासी समुदायावरही आधुनिकीकरणाचे परिणाम झालेले दिसतात. या आदिवासी समाजाला मानवी अधिकाराची जाणीव, जागृती होत असतानाच भविष्यात नव्याने अनेक सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक व धार्मिक समस्येची निर्मिती झालेली दिसते. प्रगत समाजव्यवस्थेच्या समस्यांचा शिरकाव आदिवासी समाजामध्येही झाल्याचे आढळते. भारतात मोठ्या प्रमाणावर हा आदिवासी समाज आहे, परंतु आजही तो दुर्लक्षित आहे. हा आदिवासी समुदाय खासकरून शेक्षणिकदृष्ट्या मागासलेला आढळतो. त्याचप्रमाणे आदिवासी सामुदायतील स्त्रिया अज्ञान व अंधश्रद्धेच्या बळी झालेल्या आढळतात. म्हणून आदिवासी समुदायाचा भूतकाळ, वर्तमान व भविष्य योग्य पद्धतीने जाणून घेतल्याविना निसर्गाचा समतोल आणि समताधिष्ठित समाजाची निर्मिती होणे हे केवळ अशक्य आहे. ही गोष्ट समाज सुधारक आणि राजकीय नेतृत्वाने लक्षात घेणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ:**


1) आदिवासी साहित्य संस्कृती आणि चळवळ, लेखक सोनवणे वाहरू; प्रकाशक- महाले संजय, मेधा पब्लिशिंग हाऊस, किरण नगर, अमरावती ०६, प्रथम आवृत्ती, ९ ऑगस्ट २०२०
2) प्रबोधनातील पाऊलखुणा, सरदार ग. बा. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०, आवृत्ती दुसरी
3) आदिवासींचे अनोखे विश्व, घाटी निरंजन; प्रकाशक पाटणकर अरविंद, मनोविकास प्रकाशन, नारायण पेठ पुणे ३०, द्वितीय आवृत्ती
4) मानवी हक्क; पाटील व्ही. बी. के सागर पब्लिकेशन्स , २०१२ पुणे, सातवी आवृत्ती
5) मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड सातवा; १९५० ते २००० भाग पहिला, प्रा. जाधव रा. ग. प्रकाशन महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे ३०, पहिली आवृत्ती मे २००९.